**<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र. ११९/२०२२ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

( CNR : MHAH250010672022 )

अर्जदार यांनी मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (येथुन पुढे संक्षिप्ततेसाठी 'सदर कायदा' असे संबोधण्यात येईल) कलम १२ अन्वये विविध अनुतोष मिळणेकामी दाखल केलेला आहे. मूळ अर्जाचे कामकाज प्रलंबीत असताना अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सदर कायद्याचे कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र.१ हे पती-पत्नी असुन त्यांचा विवाह दि. १७/१२/२०२० रोजी मौजे वडनेर, ता. पारनेर जि. अहमदनगर याठिकाणी सामनेवालाचे मामाचे घरी झालेला असून अद्याप कायम आहे. सदर विवाह संबंधातुन सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार क्र. १ हिस मुलगा आर्यन झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ चे घरी राहत असे. सुरुवातीचे २ महीने सामनेवालांनी तिला चांगले नांदवले. सामनेवाला क्र.१ हा महाराष्ट्र पोलीस दलात पुणे येथे नोकरी करीत होता. सुरुवातीचे काळात सामनेवाला क्र.१ हा चार पाच दिवसात त्यांचे मुळ गावी गारगुंडी येथे येत असे. नंतरच्या काळात सामनेवाला क्र.२ अर्जदारास येनकेन कारणावरुन त्रास देवु लागली. ती अर्जदार हिस शिवीगाळ करुन तिच्या आईवडीलांबाबत अपशब्द बोलत असे. अर्जदार हिने सदर बाब सामनेवाला क्र.१ यांस सांगितली असता तो तिचे काही ऐकुन न घेता तिला मारहाण करुन शिवीगाळ करीत असे. अर्जदार हिस सामनेवाला क्र.१ ते ३ यांचे स्वभावात आज उद्या बदल होईल असे वाटत होते परंतु त्यांच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही. सामनेवाला क्र.१ ते ३ अर्जदारास म्हणत असे की तुझे वडीलांनी लग्नात चांगले भांडे दिले नाही असे म्हणुन ते तिचा अपमान करुन शिवीगाळ देवुन उपाशीपोटी ठेवित असे. अर्जदार हिचे वडीलांनी लग्नासाठी केलेला खर्च लोकांकडुन घेतलेल्या पैशातुन केलेला होता त्यामुळे वडीलांना त्रास होवु नये म्हणुन ती सासरकडील सर्व जाच सहन करीत होती. अर्जदार ही पुणे येथे राहत असताना सामनेवाला क्र.१ दारु पिवुन तिला मारहाण करीत असे. सदर बाब तिने सामनेवाला क्र.२ व ३यांना सांगितली होती. तेव्हा सामनेवाला क्र.१ ते ४ तिला म्हणाले की तो सरकारी नोकर आहे, त्याच्या मर्जीप्रमाणे तुला संसार करावा लागेल. त्यावेळी अर्जदार त्यांना म्हणाली की सामनेवाला क्र.१ सोबत अत्यंत चांगल्या प्रकारे वागुनही तो तिला जाणिवपुर्वक त्रास देतो. तेव्हा सामनेवाला क्र.१ ते ४ तिला म्हणाले की तो तुझा नवरा आहे, त्याने तुला कसे

नांदवायचे ते तुम्ही दोघेच बघुन घ्या, आमचा त्यात काही संबंध नाही. तेव्हा अर्जदार सामनेवाला क्र.३ व ४ यांना म्हणाली की तुम्ही माझे लग्न जमवुन दिलेले आहे, त्यामुळे मला काही कमी वाटल्यास मी त्याची तक्रार तुमच्याकडेच करणार. त्यावेळी सामनेवाला क्र.३ व ४ तिला म्हणाले की तु सामनेवाला क्र.१ कडे तो जसे म्हणेल तसे नांदायचे, तुझे मनाचा शहाणपणा करु नकोस, नाही तर आम्ही तुझा घटस्फोट करुन त्याला दुसरी बायको करुन देवु. सामनेवाला हे अर्जदारास तिच्या अंगावरील दागदागिने काढुन घेवुन रात्री बेरात्री घराबाहेर हाकलुन देत असे. तेव्हा तिचे वडील स्वतः जावुन तिला माहेरी घेवुन येत असे. सामनेवाला क्र.१ ते ५ यांनी अर्जदाराच्या वडीलांवर वेगवेगळया लोकांमार्फत दबाव आणुन तिला नांदण्यास नेत असे. ते तिच्याशी एक दोन दिवस ब-यापैकी रहायचे तदनंतर पुन्हा त्रास देत असे. अनेकवेळा सामनेवाला क्र.१ ने नातेवाईकांच्या बैठकीत मान्य केले की यापुढे दारु पिणार नाही व अर्जदार हिस कधीही मारहाण करणार नाही, तिला चांगले नांदविल. परंतु त्यांच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही.

३. अर्जदार हिने पुढे कथन केले की दि.२/११/२०२१ रोजी तिला अर्जदार क्र.२ हा मुलगा झालेला होता. सामनेवाला क्र.१ ते ३ पैकी कोणीही तिला भेटण्यासाठी आले नाही. अर्जदाराच्या वडीलांनी अर्जदार हिची प्रसुती झाल्यानंतर सामनेवाला क्र.१ व २ यांना कळवले की तुम्हाला नातु झाला आहे. त्यावेळी सामनेवाला क्र.२ त्यांना म्हणाले की तो नातु आमचा नाही, तुम्हालाच राहु द्या, आमचा त्यांच्याशी कोणताही संबंध नाही. तदनंतर अर्जदार ही माहेरी राहत असताना सामनेवाला क्र.१ दारु पिवुन तिला म्हणाला की माझा मुलगा माझ्या ताब्यात दे, तुला नांदायचे नसेल तर नांदायला येवु नको असेम्हणुन शिवीगाळ दमदाटी केली. म्हणुन तीने सामनेवाला क्र.१ विरुध्द दि.१६/४/२०२२ रोजी पारनेर पो.स्टे. येथे अदखलपात्र गुन्हा क्र.५०७/२०२२ दाखल केला. तेव्हापासुन ती तिच्या आईवडीलांकडे राहत आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिची सामनेवाला क्र.१ कडे नांदण्याची प्रामाणित इच्छा आहे. तिने सामनेवाला क्र.१ यास अनेकवेळा फोन करुन नांदण्यास घेवुन जाण्याबाबत विनंती केली मात्र त्याने नेले नाही. सामनेवालाने कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय अर्जदार क्र.१ व २ यांचा त्याग केलेला असुन कोणतीही विचारपुस केलेली नाही अथवा अन्नवस्त्राची व्यवस्था केलेली नाही.

४. सामनेवाला क्र.१ हा पोलीस खात्यात नोकरीत असुन त्याला दरमहा रु.६००००/- उत्पन्न मिळते. सदर अर्जाचा गुणदोषावर निकाल होईपावेतो बराचा कालावधी लागणार आहे. दरम्यानचे काळात अर्जदार यांना कोर्टात जाणेयेणेकरीता तसेच वकील फी

तसेच इतर खर्चाकरीता पैश्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रु. ७५००/- सामनेवाला क्र. १ यांचेकडून अंतरीम पोटगी देण्याचा सामनेवाले यांचेविरुध्द आदेश होण्याची विनंती केली आहे.

५. प्रस्तुत अर्जावर सामनेवाला क्र.१ ते ५ यांनी नि.२२ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. सामनेवाला क्र. १ ने अर्जदार क्र. १ बरोबर दि. १७/१२/२०२० रोजी मौजे वडनेर बुद्रुक येथे विवाह झाल्याचे व लग्नसंबंध अद्याप कायम असल्याचे मान्य केले आहे. सामनेवाला क्र. १ चे पुढे असे कथन आहे की लग्नात सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिस मंगळसुत्र, कानातील झुबे, अंगठी अशी ४ ते ५ तोळयाची सोन्याची दागिने तसेच पायातील पट्टया व जोडवे घालुन लग्नाचा संपुर्ण खर्च रक्कम रु.८,५०,०००/- करुन सदर विवाह संपन्न झाला होता. विवाहानंतर अर्जदार क्र.१ सामनेवाला क्र.१ कडे नांदायला आली. सुरुवातीचे ८ दिवस ती सामनवाला क्र.१ कडे ब-यापैकी नांदली. त्यानंतर अर्जदार ही सामनेवाला क्र.१ यास म्हणु लागली की मला तु पसंत नाही, माझे आईवडीलांनी बळजबरीने तुमच्याशी माझा विवाह केलेला आहे. अस म्हणुन ती सामनेवाला क्र.१ यास मानसिक त्रास देवु लागली. मात्र नविनच विवाह झाला आल्याने सामनेवाला क्र.१ तिला समजावुन सांगत. मात्र तिच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. अर्जदार क्र.१ ही नांदत असताना कोणताही कामधंदा करीत नसे, स्वयंपाक करीत नसे. विनाकारण ती सामनेवाला क्र.१ बरोबर भांडणतंटा करुन त्याला मानसिक व शारिरीक त्रास देत असे. इतकेच नव्हे तर ती सामनेवाला क्र.२ यांचेशी विनाकारण भांडणतंटा करुन तिचा वारंवार अपमान करीत असे. तसेच सामनेवालाची आई, नातेवाईक आल्यांनतर त्यांना पाणी न देणे, जेवण न देणे, त्यांचेशी व्यवस्थीत न बोलणे, त्यांचा अपमान करणे अशाप्रकारे वागत असे. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ यास कामाला जाताना वेळेवर जेवण देत नसे. ती सामनेवालास म्हणत असे की मला तुमचे आई बरोबर एकत्रात रहायचे नाही, मला घेवुन वेगळे राहत असाल तरच मी नांदेल अन्यथा मी नांदणार नाही. अर्जदार क्र.१ किरकोळ कारणावरुन भांडणतंटा करुन माहेरी निघुन जात असे. मात्र सामनेवाला क्र.१ यास संसार करावयाचा असल्याने तो माहेरी जावुन अर्जदारास समजावुन सांगुन नांदवित होते. तरीही अर्जदाराने वेगळे राहण्याचा हेका सोडला नाही. सामनेवालास कामावरुन येण्यास उशीर झाल्यास अर्जदार त्याच्या चारीत्र्यावर संशय घेवुन भांडणतंटा करुन स्वयंपाक करीत नसे व घराचा दरवाजा बंद करुन सामनेवालास रात्रभर घराबाहेर ठेवित असे. दरम्यानचे काळात अर्जदार व सामनेवालास दि.२/११/२०२१ रोजी मुलगा झाला. अर्जदाराच्या वागण्यात

बदल होईल असे वाटत असताना तिच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही व ती मुलाकडे नीट लक्ष देत नसे व सामनेवाला तिला समजावुन सांगण्यास गेला असता ती म्हणत असे "तुझ पोरगं उकीरडयात टाकुन देईन" असे म्हणुन सामनेवालास मारहाण करीत असे. अर्जदार ही तिच्या मनात येईल तेव्हा माहेरी निघुन जात असे. तसेच सामनेवालाकडे नांदत असताना सामनेवालाविरुध्द खोटयानाटया केसेस करुन नोकरी घालवीन अशी धमकी देत असे. अर्जदार व मेहुणे राहुल कावरे यांनी सामनेवालाशी भांडणतंटा करुन दि. १५/४/२०२२ रोजी सामनेवालास मारहाण केली व उलट सामनेवालाविरुध्द पारनेर येथे खोटी एन.सी. दाखल केली.

६. सामनेवाला पुढे कथन करतो की अर्जदार त्याच्यासोबत नांदत असताना ती योग्य व रास्त कारण नसताना २०२२ रोजीच्या गणपती विसर्जनाच्या दिवशी सामनेवाला कामानिमीत्त बाहेरगावी असताना अर्जदार ही तिच्या आईबरोबर सामनेवालास न सांगता अंगावरील दागदागिने कपडालत्ता घेवुन मुलासहीत माहेरी निघुन गेली. दुस-या दिवशी सामनेवाला, त्याची आई व नातेवाईक यांनी तिच्या माहेरी येवुन तिला नांदण्यास येण्याची विनंती केली असता अर्जदाराचे आईवडीलांनी नांदवण्यास पाठवणार नसल्याचे व तिचे दुसरे लग्न लावुन देण्याचे तसेच ते मुल सामनेवाल्याचे नाही व त्यामुळे सामनेवालास मुलाशी भेटवायचे नाही असे सांगितले. सामनेवाला यांची प्रामाणिकपणे संसार प्रपंच करण्याची इच्छा आजही आहे. मात्र अर्जदार हिनेच सामनेवालास संसारसुखापासुन तसेच अज्ञान मुलाच्या प्रेमाच्या सहवासापासुन वंचित ठेवले आहे. सामनेवालास कोणतेही व्यसन नाही. त्यांनी मानसिक शारिरीक व आर्थिक छळ केलेला नाही. सामनेवाला क्र.१ यांची आई वयोवृध्द असुन त्यांना मणक्याचा व रक्तदाबाचा त्रास असुन ती सतत आजारी असते व तिचा दवाखान्याचा खर्च सामनेवाला क्र.१ करतो. तसेच तो बाहेर राहुन मेसचे जेवण घ्यावे लागत असल्याने त्याला मोठा खर्च करावा लागत आहे व त्याने वडीलांचे औषधोपचारासाठी व विवाहासाठी लोकांकडुन उसनवार रक्कम रुपये आठ लाख घेतलेले असुन आजही तो रक्कम परतफेड करीत आहे. अशा परिस्थितीत सामनेवाला क्र.१ ची अर्जदार यांना कोणतीही पोटगी देण्याची अगर नुकसान भरपाई रक्कम देण्याची आर्थिक ऐपत नाही. याउलट अर्जदार माहेरी राहत आहे व तिच्या वडीलांकडे बागायत शेती असुन त्यातुन चांगले उत्पन्न घेत आहे व इतर शेतक-यांच्या शेतीत अर्जदार मजुरीस जात असुन तिला दररोज चारशे ते पाचशे रुपये उत्पन्न मिळत आहे व तिचे माहेरी चैनीत व विलासात जिवन जगत आहे. अर्जदार ही तिची उपजिवीका करण्यास पुर्णपणे समर्थ आहे. त्यामुळे तिला

पोटगी मागण्याचा व मिळण्याचा अधिकार नाही. अर्जदार ही माहेरी राहताना सामनेवालाने लग्नात घातलेले सर्व दागदागिने व कपडालत्ता घेवुन गेली आहे व सामनेवालाकडे अर्जदार यांचे कोणत्याही प्रकारचे दागदागिने व चिजवस्तु नाही व सामनेवाला क्र.२ ते ५ यांनी अर्जदारास कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. बी.डी.सांगळे यांचा युक्तिवाद ऐकला व सामनेवालातर्फे दाखल लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द होते काय ? | ..होय. |
| २. | अर्जदार ही मागणीप्रमाणे सामनेवालांकडुन अंतरीम पोटगी व खर्च मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | ..होय. |
| ३. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता** -

८. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचे पुष्ट्यर्थ तिचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्ज व शपथपत्र वाचले. तसेच सामनेवाला यांनी मूळ अर्जास व प्रस्तुत अर्जास दाखल केलेले त्यांचे म्हणणे वाचले. अर्जदार व सामनेवाला यांचेत नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही.

९. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास शिवीगाळ करुन तिच्या आईवडीलांबद्दल अपशब्द बोलुन व तिचे वडीलांनी लग्नात चांगले भांडी दिले नाही या कारणावरुन तसेच दारु पिवुन तिला मारहाण करत असल्याबाबत व तिच्या अंगावरील दागदागिने काढून घेवुन तिला रात्री घराबाहेर हाकलुन देवुन तसेच ती माहेरी असताना तिच्या माहेरच्या घरी दारु पिवुन तिच्या मुलाला ताब्यात घेण्यासाठी शिवीगाळ,

दमदाटी करत असल्याचे कथन केले आहे. अर्जदारास सामनेवाला क्र.१ तिच्या वर्तनावर संशय घेवुन तिला वारंवार शिवीगाळ मारहाण करत असल्याबाबत अर्जदाराने तिने दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाच्या तक्रारमध्ये सांगितले असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. तसेच सदर बाबी अर्जदाराने मुळ अर्जास शपथपत्र दाखल करुन न्यायालयासमोर नमुद केलेल्या असुन त्यावरुन अर्जदारास कौटुंबिक हिसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करीता</u>** -

१०. प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदार क्र. १ हिने मूळ अर्जाचे काम प्रलंबीत असताना तिच्या व अर्जदार क्र. २ च्या उदरनिर्वाहासाठी प्रत्येकी दरमहा रक्कम रु.७,५००/- अंतरीम पोटगी सामनेवालाकडुन देणेचा आदेश होणेकामी विनंती केली आहे. अर्जदाराने नि.३ वर एन.सी.रिपोर्ट नं.५०७/२०२२, लग्नाचा फोटो व आधारकार्ड दाखल केलेला आहे. नि.क्र.२१ वर एन.सी. रिपोर्ट नं.१२८८/२०२३, नि.२५ वर एन.सी.रिपोर्ट नं.१३५७/२०२३, नि.३२ वर एन.सी.रिपोर्ट नं.१७८०/२०२३ दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदार हिने नि.२६ वर तिचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र सादर केले आहे. सामनेवाला क्र.१ याने नि.२८ वर नोटीसची प्रत, नोटीस पोहोच पावती, सोन्याच्या बिलाची प्रत, एल.आय.सी.विमा पॉलीसीच प्रत, त्याची सॅलरी स्लीप व खाते क्र.२३६ चा ८अ खातेउतारा दाखल केलेला आहे. सामनेवाला क्र.१ याने नि.२९ वर त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

११. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांचे नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही. अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ करुन तिला घरातून वस्त्रानिशी हाकलून दिल्याचे व त्यानंतर तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. अर्जदार यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे ते हलाखीचे जीवन जगत आहेत. तिला प्रस्तुतचे प्रकरण चालविताना आर्थिक अडचणी येत आहेत. याउलट सामनेवाला यांची परिस्थिती सधन असून त्यांना दरमहा रु.६०,०००/- मिळत असल्याचे कथन केले आहे.

१२. सदरच्या कथनास अनुसरुन अर्जदाराने अभिलेखावर काहीही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवाला क्र.१ याने त्याची सॅलरी स्लीपची प्रत दाखल केलेली असुन त्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसते की सामनेवाला क्र.१ यास हातात कपात

करुन रु.३०,३२९/- मिळतात. तसेच सामनेवाला क्र.१ यांनी एल.आय.सी. विम्याची पावती दाखल केलेली असुन त्याचे भरणा दरमहा रु.१९२८/- असल्याचे व त्याला नॉमीनी अर्जदार क्र.२ म्हणजेच त्यांचा मुलगा आर्यन असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. सामनेवाला यांनी अर्जदार ही तिचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम असल्याबाबतचे कथन त्यांच्या म्हणण्यामध्ये केलेले दिसते व सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे अर्जदार प्रत्येक दिवशी रु.४०० ते ५०० शेतामध्ये मजुरी करुन मिळवते. मात्र त्याबाबत कथनांव्यतिरीक्त सबळ प्रथमदर्शनी पुरावा सामनेवाला यांनी अभिलखावर आणलेला नाही. सामनेवाला क्र.१ हा पोलीस खात्यात नोकरीस असुन त्यांना दरमहा कपात करुन रु.३०३२९/- मिळत असल्याचे या स्थितीला दिसते. यावरुन सामनेवाला याची अर्जदारांना सांभाळण्याची ऐपत आहे असे म्हणता येईल. सामनेवाला क्र.१ याची पती व वडील म्हणून अर्जदारांना सांभाळण्याची, त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे. कोणतीही स्त्री सबळ कारणाशिवाय नवऱ्याला सोडून माहेरी राहणे पसंत करणार नाही. सामनेवाला क्र.१ याने त्याचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्रात त्याच्या आईस मणक्याचा व वाताचा त्रास असुन त्याचा औषधोपचाराचा खर्च व त्याचेवर अवलंबुन असलेल्या लोकांचा म्हणजेच आईचा खर्च दरमहा रक्कम रु.१०,०००/- असल्याचे व त्याने ॲक्सीस बँक, शाखा बंडगार्डन, पुणे यांचेकडे रक्कम रु.३,००,०००/- चे कर्ज तसेच ई.एम.आय. दरमहा रु.८,०००/- भरल्याचे व रु.२,००,०००/- कर्जाची थकबाकी असल्याचे, त्याचे मुलाचा वैद्यकीय उपचाराकरीता रक्कम रु.५०,०००/- खर्च केलेला आहे आणि त्यांच्या वडीलांच्या आजारपणासाठी रक्कम रु.५,००,०००/- उसनवार घेतल्याचे त्यांनी कथन केले आहे. मात्र या स्थितीला सामनेवालाने कर्ज घेतल्याबाबत व वरील नमुद केलेल्या औषधोपचाराच्या खर्चाबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तरी सामनेवाला क्र.१ याच्यावर त्याचे आईवडील अवलंबुन असल्याचे तसेच त्याने अर्जदार क्र.२ यास नॉमीनीम्हणुन एल.आय.सी. विमा मध्ये पैसे भरत असल्याचे पाहता प्रत्येकी रु.७,५००/- अंतरिम पोटगी अर्जदारांना मंजुर करणे उचीत होणार नाही. मात्र सामनेवाला क्र.१ याची अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाची व अन्नवस्त्राची सोय करण्याची नैतिक जबाबदारी पाहता अर्जदार क्र.१ हिस दरमहा रु.१५००/- व अर्जदार क्र.२ यासाठी दरमहा रु.२,०००/- अंतरिम पोटगी सदर अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन देणे न्यायोचित होईल असे मला वाटते.

१३. परिणामस्वरुप सर्व तथ्य आणि मुद्दा क्र.१ च्या नोंदविलेल्या निष्कर्षाचा विचार करता प्रकरणाच्या या टप्प्यावर सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र. १ हीस अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रु. १,५००/- व अर्जदार क्र. २ यास दरमहा रु. २,०००/- अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत होईल असे मला वाटते. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देऊन मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. २८/०४/२०२२ पासुन अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रु. १,५००/- (रुपये एक हजार पाचशे) व अर्जदार क्र. २ यास दरमहा रक्कम रु. २,०००/- (रुपये दोन हजार)अंतरीम पोटगी म्हणुन द्यावेत असे आदेशीत करण्यात येते.

सही/-
( एन. एस. सबनीस )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.३), पारनेर

दि. ०९/०१/२०२४